
Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार




वर्ष ५७ वे, अंक ६वा, मुंबई । ऑगस्ट २०२४
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 57, Issue : 6, Mumbai I August 2024
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



## स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५७वे, अंक ६वा,
ऑगस्ट २०२४
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष



**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९



**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**



दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in






**अर्थतज्ञ श्री. उदय तारदाळकर व डॉ. अभिजित फडणीस यांचे भारतीय अर्थसंकल्पावर विवेचन**



**विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२४, वडोदरा, गुजरात**



**सोलापूर देऋबा संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांची हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष म्हणून निवड : सत्कार सोहळा**


HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+ Countries Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

Best Wishes From

Reg. No. ARB/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELGAVI.

**RC NAGAR BRANCH:**
"Bhagirathi" R.S.No. 731/D-2,
C Scheme, Channamma Nagar
Main Road, Belagavi -06
Phone: 0831-2443161

**TILAKWADI BRANCH:**
CTS. No. 87/B,
Mangalwar Peth, Tilakwadi,
Belagavi -06
Phone : 0831-2430357


**SHAHAPUR BRANCH:**
CTS 1103, Ground Floor,
Bichu Galli, Shahapur
Belagavi-03
Phone: 0831-2431257

**KHANAPUR BRANCH:**
1524/A6, Mannerikar Building
Beside State Bank,
Belagavi Goa Road, Khanapur
Mob: 6363090655

**Unique Deposit Scheme With Attractive Rate of Interest**


**Kalpataru Deposit Double in 84 Months**

**HEAD OFFICE:**
"Samarth Sadan", Gurukrupa Complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI-01
Phone: 0831-2431357, 2403968, 4202100



**Ajay A. Sunalkar**
Chairman

| AKSHAY DEPOSIT* | |
|---|---|
| 46 Day to 180 Days | 6.00% p.a. |
| 181 Days to 364 Days | 6.50% p.a. |
| 1 Year | 8.00% p.a. |
| 2 Years | 9.00% p.a. |
| 3 Years | 10.00% p.a. |
| Senior Citizen Extra 1% (1,2,3 Years) | |



**Abhay V. Joshi**
Vice Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Mrs. Chaya N. Joshi
Arvind S. Kulkarni
Ganapat A. Kulkarni
Raghavendra S. Kesnur (Secretary)

Mrs. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh D. Sunagar
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri
Mrs. Gouri Bidi (General Manager)

*Terms & Conditions Apply

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

एका ब्राह्मण पत्रिकेतील लेखाने लक्ष वेधून घेतले. तो लेख होता 'शेतकऱ्यांनी शेतीत नवीन नावीन्यपूर्ण प्रयोग करावेत' अशा शीर्षकाचा. एवढे वाचून माझे कुतूहल चाळवले आणि तो लेख वाचून काढला. बाकी वृत्त सुध्दा होते. ब्राह्मण शेतकरी मंडळी अजून शेती व्यवसायात आहेत हे वाचले, कळले आणि आनंद झाला. शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत आणि ते सोडवण्यासाठी सरकार आपल्या परीने, राजकीय दबावांच्या निवडणुकीत फायदा तोटा ह्याचा साधक बाधक विचार करून प्रयत्न करत असते. अशा प्रयत्नातून शेतकऱ्यांची स्थिती किती सुधारते आणि त्यांना या मदतीचा किती फायदा होतो हा लाख मोलाचा प्रश्न आहे. प्रयत्न मनापासून नसल्याने त्याचा अपेक्षित परिणाम क्वचितच होतो. हे सर्व वृत्त वाचल्यावर आपल्या संस्था, ब्राह्मण संस्थेचे सभासद आपल्याच ब्राह्मण शेतकरी बंधूंना काय मदत करु शकतो असा विचार मनात डोकवला आणि त्याविषयी व्यक्त व्हावे अशी भावना बळावली म्हणून हा लेखन प्रपंच.

शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी माझा फारसा अभ्यास नसला तरी प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनाचा योग्य तो मोबदला मिळाला तरी त्याचे जवळपास ९५-९६ टक्के प्रश्न निकाली निघतील असा माझा समज आहे. त्यांच्या शेती उत्पादनाला योग्य ती किंमत कशी मिळेल, याविषयी आपण सगळ्यांनी विचार करणे आणि त्याचं कठोर पालन करणे, आचार करणे हे आवश्यक आहे. या शेतकऱ्यांनी त्यांची उत्पादने ब्राह्मण संस्थांच्या आवारात नेऊन विक्री करण्याचा प्रयत्न केला तर कसे असा माझ्या मनात विचार डोकवला. हे आपणास त्रासदायक आणि न जमण्यासारखे आहे असा समज होवू शकतो. ब्राह्मण सेवा मंडळ, दादरचा 'उद्योग मंदिर' म्हणून एक उपक्रम आहे. अशा उद्योग मंदिराची स्थापना प्रत्येक ब्राह्मण संस्थांनी आपल्या आवारात करून ब्राह्मण शेतकऱ्यांच्या उत्पादनाची विक्री करण्यास सहाय्य करावे. आपण सदस्यांनी येता जाता आपल्या गरजेचे सामान अशा उपक्रमातून घेणे करावे.

दुसरा प्रकार असा की हिवाळ्यात बहुतेक ठिकाणी शेती आवारात हुरडा पार्टी होत असते. तरी आपण ब्राह्मण संस्थांनी किंवा ब्राह्मण गटांनी ब्राह्मणांच्याच शेतामध्ये सहलीचा प्रयोग करून बघावा. त्यात सगळा खर्च वजा जाता ब्राह्मण शेतकऱ्यास सुद्धा बऱ्यापैकी नफा होईल हे आवर्जून बघावे. परत जाताना शेतीमालाचे सामान घेऊन नक्की जावे. त्यायोगे जेवढे सामान विकले जाईल त्या प्रमाणात त्या ब्राह्मण शेतकऱ्यास त्याचा मालाचा योग्य तो मोबदला मिळू शकेल आणि त्याच्या उत्पन्नात निदान माफक वाढ होईल.

तसेच ब्राह्मण शेतकऱ्यांनी शेती पर्यटनाचा विचार अमलात आणण्याचा प्रयत्न करावा. आपण सगळ्या ब्राह्मण मंडळींनी आवर्जून या ब्राह्मण शेतकऱ्यांच्या शेती पर्यटनाला जास्तीत जास्त हातभार लागेल असे प्रयत्न करावे. तसेच यावेळी सुद्धा परत घरी निघताना शेतीमालाची उत्पादने घेऊन निघावे. शेती पर्यटनास पूरक ठरतील अशा सोयी निदान माफक प्रमाणात उपलब्ध करून द्याव्यात. अजून बरेच करण्यासारखे आहे. त्याची चर्चा पुढे करत राहू. ह्या प्रयत्नातून ब्राह्मण शेतकऱ्यांचे सगळेचे प्रश्न निकाली निघतील अशी अपेक्षा जरी नसली तरी निदान काही प्रयत्न केल्याचे समाधान तरी असेल. ब्राह्मण शेतकऱ्यांनी होम स्टेयचा प्रयोग पण करून बघावा. घरात किंवा शेतावर २/४ किंवा अधिक लोकांची राहण्याची सोय करून तिच्या वापरातून अर्थार्जन साधावे. सुरवात करतांना अगदी उच्च दर्जाची सेवा देणे शक्य होणार नाही. मात्र माफक सुरुवात करून ती वाढवता येईल.

चला एकत्र येऊन एकमेकांना मदत करु या.

**– मिलिंद सरदेशमुख**

# नुपेक्षी कदा रामदासाभिमानी (भाग २)

**स.भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

**समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भुमंडळी कोण आहे।।**
**जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।३०।।**

या श्लोकामधे श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात की समर्थांचा जो सेवक आहे त्याच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाची हिंमत आहे? या पृथ्वीतलावर असा कोणीही नाही जो समर्थांच्या सेवकाकडे वाकड्या नजरेने पाहू शकेल. इथे वाचणाऱ्यांची गल्लत होऊ शकते समर्थांचे सेवक म्हणजे समर्थ रामदास स्वामी यांचे सेवक नव्हे तर समर्थ म्हणजे प्रभू श्रीरामचंद्र यांचे सेवक असा अर्थ इथे अभिप्रेत आहे. श्री समर्थ रामदास स्वामी हे श्रीरामास समर्थ असे म्हणत असत. श्रीरामाचे भक्त, श्रीरामाचे सेवक हे जेव्हा त्यांच्या सेवेत तल्लीन होऊन जातात तेव्हा त्यांची सर्व जबाबदारी ही प्रभू श्रीरामावर येते. बघा दैनंदिन प्रपंचातील गोष्टींबद्दल आपण किती चिंता करीत असतो. अशा चिंतांच्या ओझ्याखाली आपण दबलेले असतो, यामुळेच आपल्याला चिंतनासाठी वेळ मिळत नाही असे आपण म्हणतो. उपासना, चिंतन, साधना, जप व ध्यान यासाठी आपल्याकडे वेळच शिल्लक नाही अशी आपली कायम तक्रार असते. मला हे करायचे आहे, मला ते करायचे आहे असे म्हणत सर्व गोष्टींची जबाबदारी आपण स्वतःकडे घेतो.

**मी कर्ता ऐसे म्हणसी । तेणे तू कष्टी होसी । राम कर्ता ऐसे म्हणविसी । तेणे पावसी कष्टी होसी ।**

आणि याप्रमाणे जर आपण स्वतःकडे कर्तेपण घेतले तर प्रभू श्रीरामही म्हणत असावेत की ठीक आहे मग आता तुझी तू ती गोष्ट पार पाड. अशाने आपण कष्टात, संकटात सापडतो. श्रीरामाच्या इच्छेविना जिथे पानही हालत नाही तिथे एक साधा मनुष्य कोणतेही काम विना संकट पार पाडूच शकत नाही. परंतू जर आपण ते कर्तेपण रामावर टाकले, हे काम माझे नव्हे हे काम रामाचेच आहे असे म्हणत जर आपण कुठलेही काम हाती घेतले तर त्यात नक्कीच यश मिळते. आपल्या कामाचे कर्तेपण रामावर टाकायचे म्हणजे काहीही काम न करता हातावर हात ठेवून बसायचे का? तर नाही। पाहा आपला एक साधा अनुभव असा म्हणतो की आपण इतरांना सल्ला छान देऊ शकतो पण जेव्हा आपण स्वतः अडचणीत सापडतो तेव्हा आपल्याला आपला मार्ग चटकन सापडत नाही. काय करावे याबद्दल आपल्या मनात खूप संभ्रम असतो. जेव्हा आपण तटस्थपणे एखाद्या गोष्टीकडे पाहतो तेव्हा आपल्याला सर्व मार्ग सहज दिसतात. हा दृष्टीकोनाचा फायदा आहे. हाच दृष्टीकोन आपल्याला समर्थ रामदास स्वामी देतात. आपले काम, आपले प्रश्न हे श्रीरामावर सोपवले तर आपल्याला एक तटस्थ दृष्टीकोन प्राप्त होतो व आपल्याला अनेक मार्ग सहज दिसू लागतात व अशाच पद्धतीने आपण सतत काम करु लागतो तर आपण नक्कीच यशस्वी होतो. आपल्याला मानसन्मान व किर्ती प्राप्त होते.

जेव्हा आपण रामाचे काम आहे, मी ते करतो आहे असे मानून तसेच मनात सेवाभाव ठेवत कोणतेही काम करीत असतो. तेव्हा आपल्या कामात संकट तर येणार नाहीतच परंतू कोणा तिसऱ्या व्यक्तीच्या मनात आपले काही अहित करावे असेही येणार नाही. समर्थांच्या सेवकांवर संकट आणणे तर दूरच त्यांच्याकडे वाकड्या नजरेने पाहणाराही या भूमंडळावर कोणी नाही. ज्या श्रीरामाचे गुणवर्णन तिन्ही मंडळातील देव, देवता व सर्वच लोक करत असतात त्याच्या सेवकाकडेही सर्वजण आदरानेच पाहतात. काम आपण करीत असलो तरीही ते काम श्रीरामांचे असल्याने त्यात खोडा घालण्याची हिंमत कोणीही करु शकत नाही. अशाप्रकारे श्रीराम हे आपल्या भक्तांना, दासांना कधीही अंतर तर देत नाहीतच पण ते आपल्या भक्तांचा अभिमान बाळगतात.

# आरोग्य स्त्री जीवनाचे : स्तनाचे रोग (भाग २)

**डॉ. रश्मी फडणवीस** (स्त्रीरोग तज्ज्ञ, मो. ९८२०२८२१३०)

स्तनाचा कर्करोग जरी जगातील सर्व कर्करोगात पुढे असला तरी स्तनांच्या काही आजारांची मीमांसा मॅमोग्राफीमुळे कशी होते आणि त्याचे विश्लेषण व उपचार पाहिलेत. स्तनाच्या कर्करोगाव्यतिरिक्त स्तनांच्या ज्या आजाराकडे लक्ष देण्यास हवे त्याची सुस्पष्टपणे कल्पना आपणांस हवी. त्या आजाराची लक्षणे, त्याचा उपचार व स्तनांच्या आलेखाशी त्याचा संबंध जाणून घेणे या संगणकयुगात अतिशय आवश्यक आहे.

१) **फायब्रोसिस्टीक आजार** : सर्वसाधारणपणे ६० टक्के महिलांना हा साधा आजार असू शकतो. हा संपूर्णपणे (हार्मोन्सच्या) असंतुलनामुळे होतो. वयाच्या २० व्या ते ५६-५८ वर्षापर्यंत कोणत्याही महिलेस हा उद्भवू शकतो. दोन्ही स्तन जड होतात, हात लागला व साधा स्पर्श झाला तरी कळ येते. दोन्ही स्तनांचे जडपण मासिकपाळीआधी अधिक जाणवते तर मासिकपाळी येऊन गेल्यानंतर आपोआपच कमी होते. स्तनांचा जडपणा ही अवस्था स्तनांच्या आतील भागास सूज आल्यामुळे आकारमानात थोडी वाढ झाल्यामुळे होते. हा परिणाम संपूर्णपणे मिथाईल झॅनथिन या द्रव्यामुळे होतो. यात दोन प्रकार येतात. एकात पेशींची वाढ होऊन त्यात पाण्याच्या गाठी बनतात तर दुसऱ्या प्रकारात पेशी वाढून स्तनाग्रांना जोडणाऱ्या नलिकांचीही वाढ होते. यावर उपाय म्हणजे आहारातील मीठ कमी करणे व पाणी भरपूर पिणे.

**२) पेशींची संख्या वाढून वाढणारा स्तनांचा आकार म्हणजेच (पॉलीफेरेटीव्ह चेंजेस)** : यात स्तनाग्रांना जोडणाऱ्या दुग्धनलिकेतील पेशींची संख्या वाढते. यात पेशी अतिशय समान राहतात पण जर त्यात तफावत आढळून चाचणीमुळे एटिपिया म्हणजेच पेशींच्या वाढीत असमानता आढळली तर ती कर्करोगपूर्व स्थिती असते. अशावेळेस तो भाग काढून तपासणीस पाठवून लवकरच इलाज करावेत. साधारण वयाच्या ३०-४० वर्षात काही वेळेस स्तनांच्या पेशीत बदल घडून 'फायब्रोएडीनोसिस' ही अवस्था येऊ शकते. तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व इलाज करुन घेणे आवश्यक ठरते. 'पॉपिलोमा' ही अवस्था आपल्याला समजते ती स्तनाग्रांतून पाझरणाऱ्या द्रव्यामुळे. वरील नमूद केलेला कोणताही प्रकार असो, त्याची नीट मीमांसा करून घेणे महत्त्वाचे ठरते. त्यानुसार आहारातील बदल, व्यवस्थित आकाराप्रमाणे घालावयाची सर्पोटीव्ह ब्रेसियर, 'अ' व 'ई' जीवनसत्वांचे सेवन, आहारातील मीठाचे प्रमाण, काही वेळेस घ्यावी लागणारी संप्रेरके (इस्ट्रोजन व प्रोजेस्टेरॉन कमी प्रमाणातील) यांनी व्यवस्थितपणे हा स्तनांचा आजार ७०-९० टक्के कमी होतो.

३) **फायब्रोएडीनोमा** : स्वतः स्तनांची तपासणी करत असतां काही मुलींना वा महिलांना अशा प्रकारच्या छोट्या व मोठ्या एक वा एकापेक्षा अधिक गाठी जाणवतात. ह्याचे प्रमाण ३०-४० टक्के आहे. मासिकपाळी ते रजोनिवृत्ती या काळात कधीही याचा उद्भव होऊ शकतो. ही स्तनातील गाठ घट्ट, वलयाकार एखाद्या शेंगदाण्याच्या आकारापासून लिंबाच्या आकारापर्यंत जाणवते, पूर्णपणे सर्व दिशेतून हलणारी व कुठेही न चिकटलेली असली तरी हाताच्या तळव्यांना वा बोटांस ती स्नान करताना वा इतर वेळेस स्तन तपासणी स्वतः करताना स्त्रीस जाणवते. मॅमोग्राफी करून या गाठीची मीमांसा करणे आवश्यक ठरते. काही वेळेस याची फाईन नीडल बायोप्सी घेतली जाते. त्यात रिपोर्ट साधाच येतो. यातून कर्करोग उद्भवण्याची शक्यता फार कमी असते. यफायब्रोएडीनोमाल आकाराने लहान असल्यास शस्त्रक्रिया जरुरीची नाही. पण काही वेळेस जर तो आकाराने वाढला, वा फाईन नीडल बायोप्सीने काही वेगळ्या पेशींचे निदान झाले वा रुग्णास स्वतः त्याची शस्त्रक्रिया करुन घेणे इष्ट वाटत असेल तर शस्त्रक्रियेचा इलाज त्वरीत करावा.

४) **फायलॉईड गाठी :** अतिशय कमी आढळणारा हा प्रकार. अतिशय हळुहळु वाढणारा हा पेशींच्या वाढीचा समूह हा कोणासही होऊ शकतो. विशेषतः रजोनिवृत्तीपूर्वी काही वेळेस यात स्तन-कर्करोगाची चाहूल असते म्हणूनच याचे संपूर्ण उच्चाटन शस्त्रक्रियेने करणे अधिक हितावह ठरते.

५) **त्वचेवरील रक्तवाहिन्यांचा संसर्ग :** (सुपरफिशिअल थ्रोम्बोफ्लिबिटीस) मँडोर डिसीज ऑफ ब्रेस्ट असंही यास म्हणतात. स्त्री रुग्णास अतिशय वेदना होतात. स्तनावरील रक्तवाहिन्या त्वचा आत खेचल्यामुळे स्पष्ट दिसू लागतात. अशा स्थितीची कारणमीमांसा म्हणजे स्तनांवर झालेला आघात, शस्त्रक्रिया वा प्रसूतीदशा. फक्त शेकणे, औषध घेणे याने ही अवस्था तीन आठवड्यांच्या आत बरी होऊ शकते.

६) **स्तनांचा दाह (मॅस्टाईटीस) :** विशेषतः स्तनपान करत असताना ही अवस्था जाणवते. पण काही जणींना जर स्तनांग्रातून चिकट द्रव्य बाहेर येत असेल तर कोणत्याही वयात ही अवस्था जाणवू शकते. यात रोगजंतू संसर्ग टाळणारी औषधे, दाह कमी होणारी औषधे देऊन ही अवस्था निवळू शकते. परंतु काही वेळेस रोगजंतूसंसर्ग अधिक असल्यास स्तनांच्या त्या भागात पू तयार होतो. मग शस्त्रक्रिया करून तो पू बाहेर काढावा लागतो. काही वेळेस संशयास्पद पेशीची अवस्था वाढल्यास ती बायोप्सी तपासणीस पाठवणे हितावह ठरतं.

७) **डक्ट ऐक्टेसिया :** साधारण वयाच्या ४०-६० वर्षांच्या दरम्यान ही अवस्था जाणवते. स्तनांग्राजवळ येणारी गाठ अतिशय कठीण वेदना देणारी असते. तयात स्तनांग्रावरील त्वचेस खाज येणे, ती लाल होणे, स्तनांग्रे आतीस बाजूस ओढली जाणे अशी लक्षणे दिसतात - शस्त्रक्रिया हा उपचार ठरतो.

८) **स्तनांग्रापासून पाझरणारा स्त्राव :** याची मीमांसा अतिशय दक्षतापूर्वक करावी. काही वेळेस कर्करोगाची ही पूर्वसूचना असू शकते. योग्य वेळी योग्य उपचार, योग्य अवधान पाळल्यास स्तनांच्या कर्करोगापासून आपण दूर राहू शकतो.


JV MARKETING & INVESTMENTS

*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande*
*MBA - Marketing*

*+91 98330 25031*
*jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*
*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 9833025031**

# संलग्न संस्था वृत्त

**मुंबई** : दि. २७ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वा. मध्यवर्ती मंडळाने केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ च्या विश्लेषणासाठी वित्तीय क्षेत्रातील दोन अधिकारी व्यक्तींना बोलावले होते. श्री. उदय तारदाळकर व डॉ. अभिजित फडणीस या दोघांचे एकूणच वित्तीय क्षेत्रातील ज्ञान पाहता श्रोते मंत्रमुग्ध झाले. या दोघांनी खूप चांगल्या पद्धतीने देश हिताच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प किती महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर नवीन आर्थिक धोरणानुसार कोठे गुंतवणुक करावी हे ही श्रोत्यांना गहन विषय असुनही अत्यंत सोप्या पद्धतीने सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. आनंद कुलकर्णी यांनी केले.

**मुलुंड** : रविवार, १४ जुलै २०२४ रोजी, सायंकाळी ५.०० वाजता देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था मुलुंड शाखेतर्फे श्रीमती मंजुषा भावे यांचे आषाढी एकादिशीनिमित्त किर्तन आयोजित केले होते. या किर्तन सोहळ्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. सौ. अरुणा आग्नहोत्री यांनी परिचय करून दिला. विश्वस्त सौ. उज्वला जोशी यांनी श्रीमती मंजुषा ताईंचा सत्कार याप्रसंगी केला. विश्वस्त श्री. अजीत कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी तसेच बहुसंख्येने सदस्य उपस्थित होते.

**कल्याण** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण व एम.पी.एफ.सी. संचालक मंडळ, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने कल्याणमधील नागरीक, सभासद आणि हितचिंतकासाठी केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ वर सखोल विश्लेषणात्मक व्याख्यान व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. प्रसिद्ध अर्थसंकल्प श्री. चंद्रशेखर टिळक यांचे अभ्यासात्मक विश्लेषण झाले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

❋ बुधवार, दिनांक २४.०७.२०२४ रोजी साडेपाच वाजता देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण व एम.पी.एफ.सी. संचालक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ व सामान्य जनता या विषयावर सार्वजनिक वाचनालय कल्याण येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रम सुरु झाल्यानंतर माननीय उद्योजक मकरंद पुंडलिक, यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अर्थतज्ञ चंद्रशेखर टिळकांची ओळख करून दिली. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुळकर्णी यांनी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्थेची माहिती देऊन मान्यवरांना विश्लेषणात्मक मंथन चर्चेला सुरुवात करायची विनंती केली. मा. चंद्रशेखर टिळक यांनी त्यांच्या ओघवत्या शैलीत प्रथमच वेळेचे बंधन तसेच (कमर्शिअल ब्रेक) म्हणून त्यांनी लिहिलेल्या  व बरोबर आणलेल्या पुस्तकांची माहिती दिली. तसेच मी १९८८ सालापासून अर्थसंकल्प या विषयावर व्याख्यान देत आहे. मी स्वतः सी. ए. नसल्यामुळे मी आपल्या देशाच्या पहिल्या अर्थसंकल्पातून अभ्यास केलेला आहे. अर्थसंकल्प विषय मांडताना, त्यांनी प्रथमच सांगितले की, अर्थसंकल्प तयार होत असताना त्याच्यासाठी सरकारने केलेल्या वेगवेगळ्या समित्यांमध्ये, मी बरेच वर्षे काम करीत आलो आहे. आपण आपला देश १९९० पर्यंत जागतिक अर्थकारणाच्या बाहेर असलेला देश होता. आजची परिस्थिती फारच बदललेली आहे. आपण जागतिक अर्थकारणाच्या त्रिज्येत आलेलो आहोत. आपल्या देशाच्या अर्थमंत्र्यांनी, माननीय मोरारजी देसाई यांनी मांडलेल्या अर्थसंकल्पचा विक्रम मोडलेला आहे. कर रचनेत व गुंतवणूक बदल करणारा हा अर्थसंकल्प आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या योजना कधीच अर्थसंकल्पात मांडलेल्या नसतात, त्या बाहेरच जाहीर होतात. कुठल्याही परिस्थितीत जुनी कर प्रणाली सोडू नका. त्यांची कारणे त्यांनी त्यांच्या भाषणात सांगितले. भारताचे रुपया हे चलन व डिजिटल चलन हे आता २७ वर देशात स्वीकार झालेलं आहे. आता जगातील लोकांनी घ्यावे यासाठी प्रयत्न आहे असे त्यांनी त्यांच्या शैलीत बरेच मुद्दे मांडले व व्याख्यानाचा समारोप केला. संस्थेचे कोषाध्यक्ष दीपक देशपांडे यांनी आभार प्रदर्शन केले.

✲ कल्याणमध्ये देवस्थानप्रमुखांचा मेळावा संपन्न : ‘हिंदू मंदिरे ही फार मोठी शक्ती आहे. हिंदू समाजासमोर असलेली सर्व आव्हाने निस्तेज करण्याचे सामर्थ्य हिंदू  मंदिरात आहे,’ असा विश्वास देशविदेशात देवस्थान समन्वय चळवळ चालविणारे अधिवक्ता राजेश मुधोळकर यांनी व्यक्त केला.

कल्याणमधील भजनीगायक वै. रामभाऊ देशमुख यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त, याज्ञवल्क्य संस्था व श्री गजानन महाराज मंदिर ट्रस्टतर्फे कल्याणमधील सर्व देवस्थानप्रमुखांचा मेळावा शनिवार, दि. २७ जुलै रोजी याज्ञवल्क्य सभागृहात पार पडला. या मेळाव्याला ४५ मंदिरातील विश्वस्त उपस्थित होते.

प्रत्येक हिंदूला आपल्या परिसरातील मंदिर आपले वाटले पाहिजे, यासाठी राजेश मुधोळकर यांनी एक पंचसूत्री कार्यक्रम सांगितला.

१) प्रत्येक मंदिराची साप्ताहिक महाआरती व्हावी. सहभागी प्रत्येकाला आरतीचे तबक हातात घेता यावे. २) प्रत्येक मंदिरात धार्मिक शिक्षण दिले जावे. ३) प्रत्येक मंदिरातून आजूबाजूच्या हिंदूंची माहिती जमा करावी. ४) माहिती जमा झालेल्या हिंदूंचे गट तयार करून त्यांना मंदिर व्यवस्थापनात सहभागी करून घ्यावे. ५) ठराविक काळानंतर मंदिर विश्वस्तांची धर्म नियोजन बैठक व्हावी.

प्रास्ताविक हिंदू मंच अध्यक्ष दिनेश देशमुख यांनी केले. त्यात त्यांनी या कार्यक्रमाच्या आयोजनाचा हेतू याविषयी माहिती दिली. श्रीमलंगगड भाविक कल्याणकारी प्रतिष्ठानचे सुरेंद्र भालेकर यांनी राजेश मुधोळकर व ह.भ.प. समाधान महाराज यांचा परिचय करून दिला. गजानन महाराज मंदिराचे विश्वस्त गणेश खैरनार यांनी याज्ञवल्क्य संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण पाठक, हिंदू समाजाच्या विविध केसेस चालविणाऱ्या ॲड. सुधा जोशी, महाबळबाबा व इतर मान्यवरांचा सत्कार केला.

विवेक रानडे यांनी हिंदुत्वाचे बांधून कंकण... हे ओजस्वी गीत सादर केले. राजेश मुधोळकर व ह.भ.प. समाधान महाराज शिंगोटे यांनी मार्गदर्शन केले. आपले मंदिर हे स्फूर्तिकेंद्र करावयाचेच, असा निश्चय सर्व देवस्थान विश्वस्तांनी या मेळाव्यात व्यक्त केला.

**पुणे** : गुरुवार, दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्र प्रदेश हिंदुमहासभा आयोजित लोकमान्य टिळक पुण्यस्मरण दिनानिमित्त अभिवादन मेळावा संपन्न झाला. सदर कार्यक्रमात टिळकांचे अनुयायी थोर विचारवंत व टिळक विचाराचे प्रसारक स्व. मामाराव दाते अभ्यासु व विचारवंत. पुरस्कार भुसावळ येथील स्वा. सावरकर अनुयायी व सामाजिक कार्यकर्ते गणेश वढवेकर यांना प्रदान करण्यात आला तसेच पुण्याचे महापौर स्व. गणपतराव नलावडे झुंझार हिंदुत्वनिष्ठ पुरस्कार श्री. मिलींद एकबोटे पुणे यांना प्रदान करण्यात आला. दोन्ही पुरस्काराचे स्वरुप मानाचा ध्वज, पुष्पहार, शाल, श्रीफळ व ५००१ रु. रोख असे होते. या वेळी हिंदू महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. मुन्नाकुमार शर्मा, राष्ट्रीय नेते श्री. अभयसिंह इचगांवकर, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री. अनिल पवार, कार्याध्यक्ष श्री. तिरुपती रेड्डी तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय किर्तनकार स्व. गोविंदस्वामी आफळे यांच्या जेष्ठ कन्या सौ. क्रांतीगीता महाबळ, श्री योगश्री शरदराव जोशी मठाधिपती गुळवणी महाराज संस्थान पुणे, श्री. स्वामी उदयनाथजी महाराज मठाधिपती महायोग आश्रम आसवली, जि. सातारा हे मान्यवर उपस्थित होते. या वेळी पुरस्कार प्रदान करतांना आयोजकांनी सांगितले की भुसावळ सारख्या छोट्या शहरातुनी गेली १३ वर्षांनपासून स्वा. सावरकरांच्या तत्वज्ञानाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सातत्याने अथक परिश्रम घेत यमृत्युंजयल नावाचे मासिक श्री. वढवेकर चालवीत आहे. त्यांच्या निष्ठेला व अथक तसेच सातत्याने केलेल्या परिश्रमाला स्व. मामाराव दाते अभ्यासू व विचारवंत पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. यसावरकर विचारांचा वारसा असाच पुढे चालावाल असा प्रेरणादायी संदेश या पुरस्कारातून मिळतो. तसेच हा पुरस्कार माझ्यासाठी कार्याची पोचपावती व जेष्ठांचा गुरुजनांचा आशिर्वाद रुपी प्रसाद आहे असे मी मानतो, असे मनोगत गणेश

वढवेकर यांनी मांडले व आपण सर्वांनी सावरकरांच्या विचारांचे जातपात विरहीत विज्ञानवादी हिंदुराष्ट्र निर्माण करण्यासाठी कटिबद्ध होऊ या असे विनम्र आवाहन करून पुरस्कारांचा विनम्र स्विकार केला या वेळी पुण्यातील टिळक भक्त व सावरकर प्रेमी उपस्थित होते.

✲ **देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या अभ्यासिकेचे उद्‍घाटन** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या अभ्यासिकेचे उद्‍घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. भाजपचे प्रवक्ते संदीप खर्डेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी, कार्याध्यक्ष जयंत देशपांडे, सुनीता तावरे उपस्थित होते.

शहरातील छोट्या घरांमध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेशी जागा नसते, हे लक्षात घेऊन संस्थेने अभ्यासिका चालू केली, याबद्दल ना. पाटील यांनी संस्थेची प्रशंसा केली. अभ्यासिकेला शैक्षणिक वाचनालयाची जोड दिल्यास सहकार्य करु, असे आश्वासनही पाटील यांनी यावेळी बोलताना दिले.

जो समाज, जी संस्था काही मागत नाही, यातच या संस्थेची महत्ता आहे. कुठलीही गोष्ट ओरबाडून न घेता, आवश्यक तेवढेच घेणारी ही संस्था आहे. संस्थेच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यातील योगदानात आपणही काही तरी द्यावे, या हेतून प्रेरित होऊन मदत करण्याचे ठरविले आहे, असे संदीप खर्डेकर यांनी यावेळी बोलताना सांगितले. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपयुक्त आणि विविध पुस्तके उपलब्ध व्हावीत या करिता शैक्षणिक वाचनालये सुरु व्हावीत, असे आवाहन राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

या प्रसंगी विश्वजित देशपांडे, हेमंत रासने, राजेंद्र काकडे यांच्यासह अनेक मान्यवर आणि संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले आणि मुख्य चिटणीस सुनील पारखी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**सोलापूर** : १७ जून २०२४ रोजी सोलापूर येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था आणि ल. गो. काकडे एज्युकेशनल ट्रस्टतर्फे सभासद ज्ञाती बांधवांना पहिली ते पदव्युत्तर पर्यंत शिक्षण घेणाऱ्या गरीब आणि गरजू पाल्यांना सुमारे दीड लाख रुपयाचे अर्थसहाय्य, शिष्यवृत्ती आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी दहावी आणि बारावी मध्ये उत्तम यश मिळविलेल्या गुणवंत आणि गरीब गरजू विद्यार्थ्यांचाही सत्कार करून त्यांनाही अर्थसहाय्य आणि शालेय साहित्य देण्यात आले.

हा कार्यक्रम सोमवार दिनांक १७ जून रोजी सकाळी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या रामदास संकुल येथील समर्थ सभागृहात सोलापूरच्या सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. माधुरी वाळवेकर आणि निवृत्त प्राध्यापिका आणि इतिहासाच्या अभ्यासिका डॉ. लता अकलूजकर यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर श्रीकांत येळेगावकर होते. या प्रसंगी व्यासपीठावर संस्थेच्या महिला शाखेच्या अध्यक्षा हेमा चिंचोळकर, संस्थेच्या सहकार्यवाह आणि काकडे ट्रस्टच्या प्रमुख डॉ. नभा काकडे, संस्थेचे उपाध्यक्ष दत्ता आराध्ये, विजय कुलकर्णी, कार्यवाह श्याम जोशी, युवक शाखा अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतीश पाटील, कार्यकारिणी सदस्य रवींद्र तुळजापूरकर, प्रा. किरण कुलकर्णी आदि उपस्थित होते.

या वेळी बोलताना डॉ. वाळवेकर म्हणाल्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात उत्तुंग यश संपादन करून आपले भवितव्य उत्तम घडवावे. प्रत्येक गोष्टीत सातत्य राखावे त्यामुळे यश मिळत जाते. तर डॉक्टर अकलूजकर म्हणाल्या सर्व विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांचा आदर्श समोर ठेवला पाहिजे. छत्रपती शिवरायांनी अखंड

३५-४० वर्ष कार्य करून हिंदवी साम्राज्याची स्थापना केली होती आणि आपले ध्येय साध्य केले होते. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यातील काही वर्षे जिद्दीने अभ्यास करून आपले उद्दिष्ट, ध्येय साध्य करावे. डॉक्टर येळेगावकर यांनी आपल्या मार्गदर्शनात पालकांनी आपल्या पाल्यांवर आपल्या राहिलेल्या इच्छा आकांक्षा लादून त्यांच्याकडून पूर्ण करण्याची अपेक्षा न ठेवता विद्यार्थ्यांचा कल पाहून त्यांना शिक्षण द्यावे आणि त्यातच त्यांना प्रोत्साहन द्यावे म्हणजे त्यांची चांगली प्रगती होईल असे सांगितले. या कार्यक्रमात पहिली ते पी.एच.डी. पर्यंत शिक्षण घेणाऱ्या ११४ विद्यार्थ्यांना एक लाख ३५ हजार रुपयांचे अर्थसाह्य आणि शिष्यवृत्ती देण्यात आली तसेच ७५ डझन वह्यांचे वाटपही विद्यार्थ्यांना करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात समर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमेचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करून आणि वल्लभ आराध्य याने म्हटलेल्या ब्रह्मणस्पती सुक्तातील ऋचाने झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यवाह श्याम जोशी यांनी केले. विद्यार्थ्यांच्या नावाचे वाचन उपाध्यक्ष दत्ता आराध्ये यांनी केले. युवक शाखा अध्यक्ष सुशांत कुलकर्णी यांनी आभार मानले. शालेय साहित्यसाठी मदत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यासाठी मूळच्या सोलापूरच्या असलेल्या आणि सध्या मुंबईच्या स्वाती कुलकर्णी देशपांडे यांनी दहा हजार रुपये आणि डॉक्टर लता अकलूजकर यांनी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत केली त्याबद्दल संस्थेने या सर्वांचे आभार मानले आहेत.

✲ चार विशेष सत्कार : या कार्यक्रमांमध्ये चार विशेष सत्कार करण्यात आले. यामध्ये आदित्य अमित कामतकर यास दहावी परीक्षेत शंभर टक्के गुण मिळाल्याबद्दल, वल्लभ विनायक आराध्य याने पौरोहित्याचे शिक्षण घेत असतानाच दहावीच्या परीक्षेतही ९० टक्के घेतले आहेत त्याबद्दल त्याचा विशेष सन्मान करण्यात आला. याशिवाय सीईटी परीक्षेत ९९.६१ टक्के मिळविल्याबद्दल वरत संतोष बडवे आणि सीईटी परीक्षेतच ९८.६९१ टक्के मिळविल्याबद्दल प्रज्वल प्रमोद जोशी यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

**नाशिक** : देशस्थ ऋग्वेदी संस्थेच्या युवक शाखेची वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न. देशस्थ ऋग्वेदी संस्थेच्या युवक शाखेची वार्षिक सभा रविवार दिनांक ७ जुलै २०२४ रोजी संस्थेच्या गो. ह. देशपांडे सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेस विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला युवक शाखेचे कार्यवाह श्री. संदीप गोसावी यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात सर्व युवकांनी युवक शाखेचे सभासद होऊन युवक शाखेच्या विविध उपक्रमात सहभागी व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली. मागील इतिवृत्ताचे वाचन युवक शाखा कार्याध्यक्षांनी केले. श्री. अनंत दशपुत्रे यांनी विद्यार्थ्यांना बँकेच्या स्पर्धा परीक्षांबद्दल माहिती दिली. यावेळी अध्यक्ष श्री. मुकुंद कुलकर्णी यांनीही विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त व्यवसायाकडे वळा, त्यावर भर द्या तसेच संस्थेला थोडा वेळ देऊन वेगवेगळे उपक्रम राबवावे असे सांगितले. पुस्तकांविषयी चर्चा झाली, त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून दिली. विविध स्पर्धा व उपक्रमांवर चर्चा झाली.

सूत्रसंचालन संस्थेचे सहकार्याध्यक्ष श्री. मंदार तगारे यांनी केले. युवक शाखेत कोणकोणते उपक्रम राबवता येतील याविषयी मार्गदर्शन केले. तसेच शैक्षणिक कर्ज याविषयी माहिती दिली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. मुकुंद कुलकर्णी तसेच विश्वस्त श्री. वसंत यशवंत कुलकर्णी, युवक शाखा कार्यवाह संदीप गोसावी युवक शाखा कार्याध्यक्ष श्री. अनंत दशपुत्रे, कार्याध्यक्ष श्री. सुहास पाटील, सहकार्याध्यक्ष मंदार तगारे, महिला कार्याध्यक्ष श्रीमती सविता सातपूरकर आदी उपस्थित होते.

**बडोदा** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, बडोदे (गुजरात) तर्फे दिनांक ०४.०८.२०२४ रोजी श्री महारुद्र हनुमान संस्था वाडी येथे दुपारी ३.३० वाजता विद्यार्थी गुण गौरव तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी सत्कार समारंभात एकूण १९ विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र, रोख पुरस्कार व गुलाब

पुष्प, पेढे देऊन सत्कार प्रमुख पाहुणे श्री. राजेंद्र दिंडोरकर प्रसिद्ध रांगोळीकार व श्री. हरिश मुश्रीफ, करजण तालुक्याचे शाळेचे विश्वस्त व प्रसिद्ध बिल्डर त्यांच्या हस्ते करण्यात आले. ज्या मुलांनी खेळात सुद्धा प्राविण्य मिळवले त्यांना पण प्रोत्साहन बक्षीस देऊन गौरविण्यात आले. एकूण १०० च्या आसपास उपस्थिती होती. समग्र सभा देखील खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

## वर पाहिजे

* **अदिती दिलीप कर्डेकर :** वास्तव्य : यू.एस.ए., जन्म तारीख : ४ डिसेंबर १९८९, जन्म वेळ : संध्याकाळी ७.२०, उंची : ५.७, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : भारद्वाज, रास : कुंभ, नक्षत्र : धनिष्ठा, चरण : तृतीय, नाडी : मध्य, गण : राक्षस, वर्ण : गौर, शिक्षण : Mcom, ICWA, MBA, CPL नोकरी : डेलॉईट, अटलांटा, यु.एस.ए., उत्पन्न : प्रतिमाह रु. १,००,०००/- अपेक्षा : द्वि पदवीधर (International Degree), संपर्क क्रमांक : ९८९२२६२६५५ / ९७६९३९५६७२.

* **शर्वरी उदयशंकर केसकर :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : ४ डिसेंबर १९९०, जन्म वेळ : संध्याकाळी ६.२९, उंची : ५.६, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : पुणे, गोत्र : विश्वमित्र, रास : मिथुन, नक्षत्र : आद्रा, चरण : चतुर्थ, नाडी : आद्य, गण : मनुष्य, वर्ण : गौर, शिक्षण : Bcom, LLB, नोकरी : वकीली, कल्याण कोर्ट, उत्पन्न : प्रतिमाह रु. २०,०००/- अपेक्षा : अनुरुप, उंची ५.६च्या पुढे, संपर्क क्रमांक : ९७६९७१८५७७ / ९८२०७७३४७१.

* **आसावरी घनश्याम पारखी :** वास्तव्य : नवी मुंबई, जन्म तारीख : २० जानेवारी १९८४, जन्म वेळ : दुपारी ३.२५, उंची : ५.९, जन्म ठिकाण : दहिसर, मुंबई, मंगळ आहे, गोत्र : वशिष्ठ, रास : कर्क, नक्षत्र : आश्लेषा, चरण : तिसरे, नाडी : आद्य, गण : राक्षस, वर्ण : सावळा, शिक्षण : BSC, IT नोकरी : कॅप




Protect Capital & Create Wealth.....

**JAYANT DESHMUKH**

B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

LIC

STAR Health Insurance

Get Insured... & Be Secured....

जेमिनी सॉफ्टवेअर इंजिनिअर, उत्पन्न : प्रतिमाह रु. ५२,०००/- अपेक्षा : पदवीधर, मुंबई उपनगरात राहणारा, उंची ५.५ च्या वर, संपर्क क्रमांक : ९८६९३४३३५०.

* **भाग्यश्री महेश ब्रह्मे :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : २५ फेब्रुवारी १९९८, जन्म वेळ : संध्याकाळी ५.००, उंची : ५.५, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : काश्यम, रास : मकर, नक्षत्र : धनिष्ठा, चरण : प्रथम, नाडी : मध्य, गण : राक्षस, वर्ण : सावळा, शिक्षण : Bsc Chemestry P.G. DMLT, नोकरी : केडीएमसी मॅटरनिटी हॉस्पिटल, लॅब टेक्निसिएन, उत्पन्न : वार्षिक रु. १,००,०००/- अपेक्षा : अनुरुप, सुसंस्कृत, एकत्र कुटुंब पद्धती, द्वीपदवीधर, संपर्क क्रमांक : ९६१९२६४७७९.

* **श्वेता संजय पाठक :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : १० जून १९९८, जन्म वेळ : संध्याकाळी ७.४८, उंची : ४.८, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : वत्स, रास : धनु, नक्षत्र : मूळ, चरण : प्रथम, नाडी : आद्य, गण : राक्षस, शिक्षण : BA Economics, HR, German Language, नोकरी : HR, Executive नवी मुंबई, उत्पन्न : वार्षिक रु. ४.३३ लाख, अपेक्षा : सुयोग्य, उच्चशिक्षित, निर्व्यसनी, मोकळे कौटुंबिक वातावरण, आर्थिक सुस्थिती, संपर्क क्रमांक : ९८१९२६८६८२ / ९८२०२२३८५३.

* **सिध्दी सुहास इंगळे :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : १५ ऑगस्ट १९९८, जन्म वेळ : रात्री ११.०७, उंची : ५.४, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : गार्ग्य, रास : वृषभ, नक्षत्र : रोहिणी, चरण : प्रथम, नाडी : अंत्य, गण : मनुष्य, वर्ण : गहू, शिक्षण : B.Arch. (आर्किटेक परवानाधारक), नोकरी : वर्कस्पेअर आर्किटेक कंपनी, उत्पन्न : वार्षिक रु. ४,००,०००/- अपेक्षा : अनुरुप, संपर्क क्रमांक : ९९६७४७५०९७ / ९१६७७९१५०७.

* **पूजा चंद्रशेखर कुलकर्णी :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : ८ मार्च २०००, जन्म वेळ : सकाळी ७.४०, उंची : ५.५, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : काश्यप, रास : मीन, नक्षत्र : रेवती, चरण : प्रथम, नाडी : अंत्य, गण : देव, वर्ण : गौर, शिक्षण : B.A., राज्यशास्त्र, नोकरी : कल्याण येथील शाळेत शिक्षिका (संस्कृत विषय), उत्पन्न : वार्षिक रु. १,००,०००/- अपेक्षा : अनुरुप, सुस्वभावी, समजुन घेणारा, निर्व्यसनी, एकत्र कुटुंब, संपर्क क्रमांक : ९१६७१६२२१९ / ९७६९६४७२९८.

* **दिव्या अरुण पेठकर :** वास्तव्य : टिटवाळा, जन्म तारीख : १९ मे २००१, जन्म वेळ : सकाळी १०.१०, उंची : ५.७, सुदृढ बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : कौशिक, रास : मिन, नक्षत्र : उत्तराभाद्रपदा, चरण : चतुर्थ, नाडी : मध्य, गण : मनुष्य, वर्ण : गौर, शिक्षण : पदवीधर, BMM, Mass Media, नोकरी : लोकशाही वाहिनी, मुंबई, उत्पन्न : वार्षिक रु. ४,००,०००/- अपेक्षा : अनुरुप, संपर्क क्रमांक : ९५०६१६३६८० / ९७६९४४५३७२.

## घटस्फोटीत / पुर्नविवाह

* **कीर्ती मुकुंद कानगो :** वास्तव्य : बदलापूर,  जन्म तारीख : ३ नोव्हेंबर १९७४, जन्म वेळ : रात्री ११.२८, उंची : ५.३, सुदृढ बांधा, चष्मा आहे, जन्म ठिकाण : भुसावळ, गोत्र : भारद्वाज, रास : मिथुन, नक्षत्र : मृग, चरण : चतुर्थ, नाडी : मध्य, गण : देव, वर्ण : गव्हाळ, शिक्षण : बीए, ग्रंथपाल, कॉम्प्युटर कोर्स, नोकरी : नोकरीच्या शोधात आहे., उत्पन्न : नाही, अपेक्षा : स्वावलंबी, संपर्क क्रमांक : ९९२२६२०४८८.

* **ललिता लक्ष्मीकांत बुरसे :** वास्तव्य : पुणे, जन्म तारीख : १९ नोव्हेंबर १९७८, जन्म वेळ : दुपारी ३.५५, उंची : ५.२, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : पुणे, गोत्र : भारद्वाज, रास : मिथुन, नक्षत्र : पुर्नवसु, चरण : चतुर्थ, नाडी : आद्य, गण : देव, वर्ण : गौर, शिक्षण : Mcom, Diploma in Computer, नोकरी : नाही,

उत्पन्न : नाही अपेक्षा : विधुर / घटस्फोटीत, अपत्य असल्यास स्विकारण्याची तयारी, वयातील अंतर ३ वर्षे, पुणे, मुंबई, बेंगलोर, पश्चिम महाराष्ट्र, संपर्क क्रमांक : ७३७८८५९००५.

## वधू पाहिजे

* **हितेंद्र प्रदिप देशमुख :** वास्तव्य : नाशिक, जन्म तारीख : ११ जून १९८६, जन्म वेळ : पहाटे ३.५५, उंची : ५.५, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : कश्यप, रास : कर्क, नक्षत्र : पुर्नवसु, चरण : चतुर्थ, नाडी : आद्य, गण : देव, वर्ण : गहू, शिक्षण : Bcom, MBA Finance, PG DBM, नोकरी : कल्याण जनता सहकारी बँक, शाखाधिकारी, नाशिक, उत्पन्न : वार्षिक रु. १०,००,०००/- अपेक्षा : उच्च शिक्षित, नोकरी करणारी किंवा नोकरी करण्याची तयारी असणारी, संपर्क क्रमांक : ९४०३११७४१२ / ८३७८९४४९३०.

* **राहुल श्रीकांत होळेहुंन्नर :** वास्तव्य : कल्याण (पूर्व), जन्म तारीख : ७ जुलै १९९५, जन्म वेळ : रात्री १२.५६, उंची : ५.६, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : नाशिक, गोत्र : अगस्ती, रास : तूळ, नक्षत्र : चित्रा, चरण : तृतीय, नाडी : मध्य, गण : राक्षस, वर्ण : गौर, शिक्षण : Mcom, नोकरी : ECE Industries Ltd (Accounts Department), उत्पन्न : वार्षिक रु. ४,८०,०००/- अपेक्षा : मनमिळावू, नोकरी करणारी, संपर्क क्रमांक : ७२०८१९०८५० / ९८७०४७४५८३.

* **प्रसेनजीत वैष्णवीप्रसाद रानडे (कोकणस्थ) :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : २८ फेब्रुवारी १९९६, जन्म वेळ : १०.३५, उंची : ५.४, मध्यम सुदृढ, जन्म ठिकाण : गुलबर्गा, कर्नाटका, गोत्र : भारद्वाज, रास : मिथुन, नक्षत्र : आद्रा, चरण : प्रथम, नाडी : आद्य, गण : देव, वर्ण : गौर, शिक्षण : BE Electrical, नोकरी : मर्चंट नेव्ही, नाशिक, उत्पन्न : वार्षिक रु. १२,००,०००/- अपेक्षा : अनुरुप, संपर्क क्रमांक : ९८२०१४८३०७.

* **यश विनय घळसासी :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : १५ जुलै १९९६, जन्म वेळ : रात्री ११.२०, उंची : ५.१०, मध्यम सुदृढ, जन्म ठिकाण : कराड, गोत्र : जमदग्नी, रास : कर्क, नक्षत्र : पुर्नवसु, चरण : चतुर्थ, नाडी : आद्य, गण : देव, वर्ण : गौर, शिक्षण : BE Electronics, MBA in Marketing, नोकरी : Wictor Consaltancy Thane, उत्पन्न : वार्षिक रु. १५,००,०००/- अपेक्षा : उच्च शिक्षित, मनमिळावू, नोकरी असावी, संपर्क क्रमांक : ९०२९९१७४०९ / ९१३७२१८५८६.

* **चिन्मय घनश्याम आमटे :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : २१ डिसेंबर १९९६, जन्म वेळ : रात्री ११.५६, उंची : ५.१०, मध्यम सडपातळ, जन्म ठिकाण : डोंबिवली, गोत्र : भारद्वाज, रास : सिंह, नक्षत्र : मूळ, चरण : चतुर्थ, नाडी : मध्य, गण : मनुष्य, वर्ण : गौर, शिक्षण : Bcom, (C.F.A. Level I), नोकरी Consultant at E & Y (Dadar – Mumbai), उत्पन्न : वार्षिक रु. १२,००,०००/- अपेक्षा : सुस्वाभावी, कुटुंबवत्सल, एकत्र कटुंबात राहण्याची तयारी, संपर्क क्रमांक : ८४२४८८४४१४ / ९५९४०४२५००.

* **अमेय सुनील बेलसरे :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : २३ फेब्रुवारी १९९७, जन्म वेळ : दुपारी २.१०, उंची : ६, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : भारद्वाज, रास : सिंह, नक्षत्र : पूर्वा, चरण : तिसरे, नाडी : मध्य, गण : मनुष्य, वर्ण : गौर, शिक्षण : Bsc IT, नोकरी : I.T. Co. Point 1, Navi Mumbai, Turbhe,, उत्पन्न : वार्षिक रु. ४,००,०००/- अपेक्षा : अनुरुप, मनमिळावू, शाखाहारी, पदवीधर, संपर्क क्रमांक : ९७६९४६८२१५ / ९७६९६८४०१६.

**⁕ चिन्मय गजानन कोनकर (कऱ्हाडे) :** वास्तव्य : पाली, सुधागड, जन्म तारीख : १७ जून १९९८, जन्म वेळ : रात्री ११.४७, उंची : ५.०७, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : नागोठणे, रायगड, गोत्र : शालाक्ष, रास : मिन, नक्षत्र : उत्तराभाद्रपदा, चरण : द्वितीय, नाडी : मध्य, गण : मनुष्य, वर्ण : गौर, शिक्षण : BE (E & TC), नोकरी : TCS, Belapur, उत्पन्न : वार्षिक रु. ७,००,०००/- अपेक्षा : मनमिळावू, पदवीधर, नोकरी करणारी, संपर्क क्रमांक : ८६०५९८९७४९ / ८१४९६३१९९७.

**⁕ प्रणव श्रीकांत केळकर, (कोकणस्थ) :** वास्तव्य : डोंबिवली, जन्म तारीख : २८ जुलै १९९८, जन्म वेळ : संध्याकाळी ६.१०, उंची : ५.०२, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : डोंबिवली, गोत्र : शांडिल्य, रास : कन्या, नक्षत्र : उत्तरा फाल्गुनी, चरण : चतुर्थ, नाडी : आद्य, गण : मनुष्य, वर्ण : गौर, शिक्षण : Mcom, GDCA, नोकरी : Co-operative Bank, उत्पन्न : वार्षिक रु. २,००,०००/- अपेक्षा : नोकरी करणारी, घर सांभाळणारी, संपर्क क्रमांक : ९०८२४७८८३५ / ९८१९५१७१३४.

## घटस्फोटीत / पुर्नविवाह

**⁕ योगेश उपेंद्र पाटे :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : २४ ऑगस्ट १९८०, जन्म वेळ : रात्री ११.२५, उंची : ५.१०, सुदृढ बांधा, जन्म ठिकाण : कल्याम, गोत्र : भारद्वाज, रास : मकर, नक्षत्र : श्रवण, चरण : तृतीय, नाडी : अंत्य, गण : देव, वर्ण : गौर, शिक्षण : BTech Electrical Engin., नोकरी : Inspection Engin.,, उत्पन्न : वार्षिक रु. ४,००,०००/- अपेक्षा : अनुरुप, संपर्क क्रमांक : ९८६९६५६६१९.

**⁕ संकेत प्रमोद कुलकर्णी :** वास्तव्य : कल्याण, जन्म तारीख : १२ एप्रिल १९८८, जन्म वेळ : रात्री ११.५९, उंची : ५.०८, चष्मा आहे, मध्यम बांधा, जन्म ठिकाण : कल्याण, गोत्र : भारद्वाज, रास : कुंभ, नाडी : आद्य, वर्ण : गौर, शिक्षण : MCA, नोकरी : Wipro Project Manager, उत्पन्न : वार्षिक रु. ३०,००,०००/- अपेक्षा : सरकारी नोकरी असावी, कर्क रास नको, संपर्क क्रमांक : ९९८७०३२७८८ / ९९६७६५३१५८.

(**टीप :** स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील)

## देणगी

श्री. शरद तांबोळकर पुणे यांनी अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळास शैक्षणिक व इतर सामाजिक उपक्रमासाठी रु. १०,०००/- ची ऐच्छिक देणगी दिली आहे. श्री. शरद तांबोळकर यांना मध्यवर्ती मंडळातर्फे त्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी मदत झाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून मध्यवर्ती मंडळाचे आभार मानले. श्री. तांबोळकर यांचे मध्यवर्ती मंडळ आभारी आहे.

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ आयकर कायदा १९६१ च्या कलम ८०जी अंतर्गत सवलत प्राप्त आहे. याचा लाभ आयकर नियमाप्रमाणे सभासदांना व देणगीदारांना घेता येईल. तसेच कंपनी कायदा २०१३ नुसार भारतामधील कार्यरत असणाऱ्या सर्व कंपन्यांना कार्यक्रमासाठी एक ठराविक निधी द्यावा लागतो. या निधीच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण रक्षण अशा अनेक क्षेत्रातील उपक्रम पुर्ण केले जातात. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी कंपन्यांकडून CSR फंडासाठी संस्थेस मदत करावी. यासाठी लागणारा दाखला (CSR Fund Certificate) संस्थेकडे उपलब्ध आहे. संस्थेच्या विविध सामाजिक उपक्रमांचा विस्तार चालू असताना त्याला योग्य ती मिळण्यासाठी अर्थातच निधी संकलन करणे गरजेचे आहे. यासाठी सक्रीय आर्थिक सहकार्याची अपेक्षा. देणगीदारांनी कार्यालयाशी संपर्क साधावा.

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

**Ravindra Deshpande**

REC

# RASHMI
# ELECTRICAL & CONTRACTOR

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20% OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com

# ये कौन चित्रकार है?

**सौ. ज्योत्स्ना श्रीकांत मुळावकर (मो. : ९८९२७७२९१७)**

कौलावर तडतडणाऱ्या थेंबांनी कळायचं पाऊस आला. पाठोपाठ यायचा छान गाऱ्याच्या गार वाऱ्याच्या झुळकी बरोबर, पहिल्या पावसाने तृप्त झालेल्या धरणी मातेचा मृदंगध.

अचानक आलेल्या या पावसाने तारांबळ व्हायची. गेल्या वर्षीपेक्षा नवीनच ठिकाणी छप्पर गळायला सुरुवात झालेली असायची. मग पलंगावर, कपाटावर, बाहेरच्या खोलीत अगदी मध्यभागी, जिथे जिथे ठेवताय तिथे बादली, पातेली मांडायची. पुढच्या आणि मागच्या दारात बादल्या टब ठेवायचे पागोळ्यां खाली. त्यात पडणारे पावसाचे थेंब तालात आपापला सूर लावायचे आणि या जलतरंगाची एक धून नादावून टाकायची.

पक्षांचे थवे अंगणातल्या झाडांच्या आश्रयाला यायचे, कावळा, चिमणी, कबूतर, साळुंखी, बुलबुल, हळद्या, बगळा...जो तो आपापले ओले गच्च पंख फडफडवून पाणी झटकून वाळवायचा प्रयत्न करायचे, तर पुढच्या दारातल्या पायरीवर टाकलेल्या पोत्यावर कुत्रा येऊन थंडीने कुडकुडत पाण्याने भिजलेलं अंग झटकत बसायचा. मागच्या दारातल्या पोतेऱ्यावर मनी गुरगुटून बसायची. घरा बाजूच्या तळ्यातली पाणकोंबडी डोकं वर करून भरकम तळ्याला गिरकी मारून, पुन्हा पाण्यात गायब व्हायची. आकाशवाणीवर शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमात अशावेळी हमखास कुणी बुजुर्ग गायक मल्हार आळवत असायचा, त्याच वेळी आईने ठेवलेल्या दारातल्या गवती चहा घातलेल्या उकळत्या चहाचा सुगंध घरभर पसरायचा. असं सूर आणि गंधाच्या साथीने ते निसर्ग चित्र संपूर्ण व्हायचं.

अंगणातला प्राजक्त, सोनचाफा, अनंत, मोगरा आणि अगदी मोठा नारळ, आंबा, पाण्याच्या हापसी पाशी असलेली कर्दळ, केळी, सगळी पावसाच्या पाण्याने तृप्त होऊन न्हावून माखून निघायची आणि आपलं नवीन रूप तळ्याच्या पाण्यात निरखत बसायची. पावसाचा जोर हळूहळू वाढू लागला, वारे जोरात वाहू लागले की, गायकाच्या तानांना श्रोत्यांनी मानावेळावून दाद द्यावी, तशी सगळी झाडं, कोणी फांद्या डाव्या बाजूकडून उजव्या बाजूकडे तर कोणी फांद्या वर खाली अशी पावसाला मन भरून दाद देऊ लागायची. पुढे अजूनच पावसाचा जोर वाढला की मग मात्र इतक्या वेळचा आनंद जाऊन आता जरा थांब रे असं वाटायचं.

अशावेळी इंदिरा संत यांची कविता – 'नको नको रे पावसा असा धिंगाणा अवेळी घर माझा चंद्रमौळी आणि दारात सायली । नको नाचू तडतडा असा कौलारावरून ।।'

तांबे सतेली पातेली आणू भांडी मी कोठून नको करू झोंबा झोंबी माझी नाजूक वेलण नको टाकू फुलमाळ अशी मातीत लोटून अक्षरश: ही कविता अनुभवायला मिळायची आणि मग शहाण्या पावसाने आपल ऐकलं, तो थांबला की मग सगळ्या आजूबाजूच स्वच्छ मोकळं वाटायचं. मग परिसरात एक चक्कर मारून यायचं. आईमागून ओरडत असायची, अग बाहेर चिखल आहे पाय घसरून पडशील, घरात बस बघू. पण अशावेळी अजिबात न ऐकता त्या ओल्या मातीवरून पाय घसरून न देता फिरायचं, झाडाखालून जाताना अजूनही पानात रेंगाळलेले पावसाचे थेंब अवचित अंगावर पडायचे आणि तो थरार अनुभवायचा. पक्षी सुद्धा झाडांना सोडून आकाशात मस्त भरारी घ्यायचे, त्यांना पाहायचं.सृष्टीच सुस्नात रूप पाहून मन अगदी प्रसन्न व्हायचं.मग हळूच दारात येऊन पागोळ्याच्या साठलेल्या पाण्याने मातीचे पाय स्वच्छ करायचे. आहाहा काय तो पावसाच्या साठलेल्या पाण्याचा थंड थंड स्पर्श, पुन्हा पुन्हा पायावर घ्यावासा वाटणारा.पण परत आईची हाक यायची, पाण्यात खेळू नकोस ग, घरात ये पटकन की मग पोत्यावर पाय टिपत घरात यायचं. निसर्गाच्या या लिलेने अचंबित व्हायला व्हायचं. थोड्या वेळापूर्वी होणारी उन्हाने जीवाची काहिली, कोंडल्या सारखा नि:स्तब्ध निसर्ग आणि क्षणार्धात फिरत्या रंगमंचासारखा सीन पालटावा, अगदी तसाच. काय निसर्गात जादू आहे ना, एक पावसाची सर सारी सृष्टी बदलून टाकते. एखाद्या सिद्धहस्त चित्रकाराने आपल्या कुंचल्याचा एक फटकारा कॅनव्हास वर मारावा आणि त्या जादूच्या स्पर्शाने आधीचे चित्र झळाळून उठावे. खरंच, ये कौन चित्रकार है, ये कौन चित्रकार है? आपण ते चित्र पाहून दंग व्हावे.

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

# देशस्थ ऋग्वेदी संस्थेच्या युवक शाखेची वार्षिक सभा खेळीमेळीत संपन्न (नाशिक)

